## रे. दि. मु. क्रमांक ८२/२०१२ मधील नि.क्र. ५९ खालील आदेश.
## रविंद्र सोनवणे व इतर -विरुध्द- मोहन देडे व इतर
## आदेश पारित दिनांक १०.०७.२०२३

वादींनी प्रस्तूतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला उशीर माफ करणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जासहीत वादीचे वारस श्री. रविंद्र बाबूराव सोनवणे यांचे सत्यप्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ६० वर अभिलेखावर दाखल केले आहे.

**०२.** प्रस्तूत अर्जात वादीचे असे कथन आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे हे दिनांक २४.०१.२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्याच्या पुष्ठ्यर्थ वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम सोनवणे यांच्या मृत्यू उताऱ्याची प्रमाणित प्रत नि.क्र. ६६ वर अभिलेखावर दाखल केली आहे. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरिता सदर मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला. त्यामुळे वादीने मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम सोनवणे यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला उशीर माफ होवून मिळावा, ही विनंती केली आहे.

**०३.** सदरकामी, प्रतिवादी यांनी हे म्हणणे दाखल केले आहे की, अर्जात कथन केलेला मजकूर खरा व बरोबर नाही. वादीने याकामी केलेला उशीर याबाबत स्पष्ट खुलासा नाही. रुपये ५००/- ची कॉस्ट वादीस व्हावी व योग्य तो मे. कोर्टाचा हुकूम व्हावा, ही. विनंती केली आहे.

**०४.** वादीचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे हे दिनांक २४.०१.२०२२ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम सोनवणे यांचे वारस अभिलेखावर घेतल्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर देणेकरिता मदत होणार आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचा अंतिम निकाल होणेकरिता मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या वारसांची नावे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. मयत प्रतिवादी क्र. ३ यांच्या वारसांची नावे विहित वेळेत अभिलेखावर घेतले नसल्याचे संयुक्तीक कारण अर्जात नमूद केले आहे. परंतु, प्रस्तूत मयत

प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता विलंब झाल्यामुळे सदर प्रकरण लांबणीवर पडलेले आहे. त्यामुळे वादीस सदर विलंबाकरिता कॉस्टची आकारणी करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. तरी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र. ५९ चा अर्ज रक्कम रुपये २००/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे फक्त) इतक्या कॉस्टच्या आकारणीवर मंजूर करण्यात येतो. सदर कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा समिती, खंडाळा येथे जमा करावी. |
| २. | मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

(अ. क. दामटे)

दिनांकः- १०.०७.२०२३

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.